# उस्मानाबाद जिल्हा जिल्हास्तरीय वाळूघाट लिलाव सन 2018-2019 ची अधिसूचना
## जिल्हास्तरीय 08 वाळूघाटासाठी प्रथम फेरी (गतवर्षी लिलावात न गेलेले व नविन वाळुघाट)

**जिल्हाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद.**
**जा.क्र.2018/मह/गौख/सीआर-23**
**दिनांक :- 27/02/2019**

सर्व जनतेस याव्दारे कळविण्यात येते की, शासन निर्णय क्रमांक: गौखनि/10/0615/प्र.क्र.289/ख दिनांक 03 जानेवारी 2018 मधील तरतूदीनुसार आणि मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.2018/मशाका/गौख/वा.लि.18-19/प्र.क्र.14 दिनांक: 19/09/2018 अन्वये मंजूरी दिल्यानुसार सन 2018-2019 या वर्षाकरिता उस्मानाबाद जिल्हयातील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा उस्मानाबाद यांनी प्रमाणित केलेल्या तसेच ग्रामसभेचे नाहरकत ठराव प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या SEAC व SEIAA यांच्या अटी व शर्तीनुसार वाळूघाटाचा लिलाव (ई निविदा /ई लिलाव) पध्दतीने करणेत येत आहेत. https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई निविदा ऑनलाईन भरणा करावी लागेल. तसेच ई लिलावासाठी https://eauction.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन बोली लावता येईल.

ज्या व्यक्ती,संस्था,इ.यांनी ई निविदा मध्ये भाग घेतला आहे, अशा सर्व व्यक्ती,संस्था,इ.चा ई निविदामधील तांत्रिक लिफाफा ऑनलाईन उघडण्यात येईल. ई लिलाव प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ई निविदेचा आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. अशाप्रकारे ई निविदा व ई लिलाव यामध्ये जी बोलीची रक्कम जास्त असेल त्या रक्कमेचा लिलाव अंतिम करण्यात येईल.

वेळापत्रक

| अ.क्र. | अनुक्रमणिका | दिनांक व वेळ | |
|---|---|---|---|
| 1 | ई निविदा प्रसिध्दी | 28/02/2019 | |
| 2 | ई निविदा विक्री सुरवात | 28/02/2019 | |
| 3 | ई निविदा स्विकृती सुरुवात | 28/02/2019 | |
| 4 | ई निविदा विक्री शेवट | 06/03/2019 | 18:50 |
| 5 | ई निविदा स्विकृती शेवट | 06/03/2019 | 18:50 |
| 6 | ई निविदा तांत्रिक लिफाफा उघडणे | 07/03/2019 | 10:00 |

ई लिलाव (ई ऑक्शन) वेळापत्रक

| अ.क्र. | अनुक्रमणिका | दिनांक व वेळ | |
|---|---|---|---|
| 1 | ई लिलाव प्रसिध्दी | 28/02/2019 | |
| 2 | ई लिलाव कागदपत्र स्विकृती सुरवात | 28/02/2019 | |
| 3 | ई लिलाव कागदपत्र स्विकृती शेवट | 06/03/2019 | 18:50 |
| 4 | ई लिलाव कागदपत्र मान्यता सुरूवात | 06/03/2019 | 18:55 |
| 5 | ई लिलाव कागदपत्र मान्यता शेवट | 07/03/2019 | 18:55 |
| 6 | ई लिलाव सुरूवात | 08/03/2019 | 11:00 |
| 7 | ई लिलाव शेवट | 08/03/2019 | 16:00 |

1.वाळू/रेती लिलाव हे ई निविदा व ई लिलाव पध्दतीने घेण्यात येणार आहेत,त्याकरीता सदर प्रक्रियेत भाग घेवू इच्छिणा-याकडे डिजीटल सिग्नीचर असणे आवश्यक आहे,तसेच ई निविदा www.mahatenders.gov.in व ई लिलावा करिता https://eauction.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

2.ई निविदा, ई लिलावात भाग घेण्यासाठी आवश्यक पात्रता.

अ.नियमित आयकर भरत असल्याचा पुरावा,पॅन क्रमांक व जीएसटी क्रमांक असणे आवश्यक राहील.

ब. ई निविदा,ई लिलावात भाग घेणा-या व्यक्ती,संस्था,इ. यांनी ज्या वाळू गटाची हातची किंमत रू.10.00 लाख पेक्षा कमी असल्यास रू.2000/- व रू.10.00 लाखापेक्षा जास्त असल्यास रू.5000/- जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचे नावे बँकेच्या धनाकर्षशाव्दारे (डीडी) भरणा करावे.

क. ई निविदा, ई लिलाव यात भाग घेणा-या व्यक्ती,संस्था,इ. यांनी इसारा रक्कम म्हणून आपसेट प्राईसच्या 25% रक्कम RTGS व्दारे भरावी लागेल. **तहसीलदार सर्वसाधारण उस्मानाबाद**, खाते क्र.**35078406263** IFSC Code **SBIN0001974**, बँकेचे नाव स्टेट बँक ऑफ इंडिया मुख्य शाखा उस्मानाबाद या खात्यात 25% रक्कम RTGS व्दारे भरणा करावी.

**टीप: उपरोक्त भरणा केलेल्या रक्कमेची पावती व यासोबत दिलेले हमीपत्र, ई निविदा, ई लिलावाच्या तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करणे बंधनकारक राहील.**

ड. जिल्हा खनिज प्रतिष्ठाण उस्मानाबाद खात्यावर लिलावातील सर्वोच्च बोलीच्या 10 टक्के रक्कम ना परतावा जमा करणे लिलावधारकास बंधनकारक राहील.

3.ई निविदा,ई लिलाव स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे,रद्द करण्याचे तसेच ई निविदा,ई लिलावाचे जाहीर प्रगटनामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी उस्मानाबाद व अपर जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

4.ई निविदा ,ई लिलाव मंजूर झालेल्या व्यक्तीला सर्वोच्च बोलीच्या ¼ रक्कम लिलावाच्या बीड ओपनींग दिवशी भरणा करावी लागेल. तसेच उर्वरित ¾ रक्कम बीड ओपनिंगच्या दिवसापासून 15 दिवसांचे आत भरणा करावी लागेल. त्यानंतरच लिलावधारकास वाळूगटाचा उत्खननासाठी ताबा देण्यात येईल. तोपर्यंत वाळूगटातून उत्खनन करण्यास सक्त मनाई असेल. **लिलावधारकास 100 रूपये च्या मुद्रांकपेपरवर करारनामा, हमीपत्र दिलेल्या नमुन्यात सादर करणे बंधनकारक राहील**. अपवादात्मक परिस्थीतीत लिलावाच्या बोलीच्या ¾ रक्कम भरण्याची मुदत आणखीन 15 दिवसा पर्यंत वाढवीण्याचे अधिकार, त्यासंबंधीचे कारणे नोंदवुन जिल्हाधिकारी यांना राहतील. मात्र अशा परिस्थीतीत लिलावधारकास विलंबाने भरलेल्या सदर रकमेवर 15 टक्के वार्षीक दराने व्याज भरावे लागेल.

5.जाहीर ई निविदा, ई लिलावा संबधी सर्व माहिती वाळू लिलावाच्या अटी / शर्ती वाळू गटाची शासकीय किंमत व इतर सर्व माहिती जिल्हाधिकारी कार्यालय,गौण खनिज शाखा, उस्मानाबाद व जिल्हयातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांचे कार्यालय येथे व www.osmanabad.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

6.ई निविदा,ई लिलाव मध्ये ज्या वाळूगटांना बोली लावली नसल्यास त्या वाळुगटांकरीता मुदतवाढ देण्यात येईल याबाबतची सविस्तर माहिती उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

# उस्मानाबाद जिल्हा वाळू लिलाव सन 2018-2019 ची अधिसूचना प्रथम फेरी (गतवर्षी लिलावात न गेलेले व नविन वाळुघाट) जिल्हास्तरीय 08 वाळूघाटाची माहिती

| अ. क्र. | तालुका | नदीचे नाव | गावचे, वाळू स्थळाचे नाव | लिलावाचा कालावधी | लगतचे स.नं./ग.नं. | उपलब्ध वाळूसाठा ब्रासमध्ये | मा.विभागीय आयुक्त कार्यालयाने मान्यता दिलेली हातची किंमत (रूपये) | 25% भरावयाची रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | परंडा | उल्फा | खासगांव-सोनगिरी | मंजूर परिमाण पूर्ण होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त तीन महिने किंवा 30 सप्टेंबर 2019 यापैकी जे अगोदर पूर्ण होईल ते. | 50,38,39,40,37,04,05, 153 (खासगाव) 34,04,05,6/2 (सोनगीरी) | 1546 | 3005424/- | 751356/- |
| 2 | परंडा | खैरी | तांदुळवाडी | मंजूर परिमाण पूर्ण होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त तीन महिने किंवा 30 सप्टेंबर 2019 यापैकी जे अगोदर पूर्ण होईल ते. | 20 ते 22,16,14,8 ते 10, 873,2 ते 5,443,434 ते 437 ,430,431,246, 240,241,231 ते 238, 211 ते 218 ,23 ,92 ,95,98,100ते105,194,195, 199,200,201ते 204,208,210 | 2650 | 5151600/- | 1287900/- |
| 3 | परंडा | उल्फा | देवगांव(खु) - वडणेर | मंजूर परिमाण पूर्ण होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त तीन महिने किंवा 30 सप्टेंबर 2019 यापैकी जे अगोदर पूर्ण होईल ते. | 1ते16,102,292,293,295,203 ,215,216,217,218,201,200, ,199,19,06,193,192,183,18 1,175,173,179,180,194,195 ,44,42,43,48, 70,69,(देवगाव.खु) 239,245,01,12,14,16,17 ,214 ते 220, 223, 224, 229,230,237,238,240,244, 24,05 (वडणेर) | 2714 | 5276016/- | 1319004/- |
| 4 | परंडा | चांदणी | ढगपिंपरी | मंजूर परिमाण पूर्ण होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त तीन महिने किंवा 30 सप्टेंबर 2019 यापैकी जे अगोदर पूर्ण होईल ते. | 08,07,06,05,04,382,396, 397,398,399,01,02,03,240, 230,238,237,236,34 ते 43 ,46,69,25 ते 30,430, 176, 178,195 | 1436 | 2791584/- | 697896/- |
| 5 | परंडा | चांदणी | हिंगणगाव(बु) | मंजूर परिमाण पूर्ण होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त तीन महिने किंवा 30 सप्टेंबर 2019 यापैकी जे अगोदर पूर्ण होईल ते. | 01,02,10,16 ते 21,56,40,34 ते 36,49,50 | 1299 | 2525256/- | 631314/- |
| 6 | परंडा | सीना | लोहारा | मंजूर परिमाण पूर्ण होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त साडेचार महिने किंवा 30 सप्टेंबर 2019 यापैकी जे अगोदर पूर्ण होईल ते. | 122,126,129,130,132,133, 134,158,164,165,167,170, 172,176,177,178 | 3166 | 6154704/- | 1538676/- |
| 7 | परंडा | सीना | वागेगव्हाण | मंजूर परिमाण पूर्ण होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त तीन महिने किंवा 30 सप्टेंबर 2019 | 1,2,3,4,7,8,9,10,25,26,27,35 ,40 | 2067 | 4018248/- | 1004562/- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | यापैकी जे अगोदर पूर्ण होईल ते. | | | | |
| 8 | परंडा | उल्फा | **आवारपिंपरी** | मंजूर परिमाण पूर्ण होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त तीन महिने किंवा 30 सप्टेंबर 2019 यापैकी जे अगोदर पूर्ण होईल ते. | 01,02,03,29,30,27,38,31,32, 34,33,42,147,148,146,21, 15,14,27,28 | **2226** | **4327344/-** | **1081836/-** |

**(पराग सोमण)**
**अपर जिल्हाधिकारी उस्मानाबाद**

**<u>वाळू / रेती उत्खननासाठी सर्वसाधारण निर्बंध व अटी / शर्ती</u>**

(i) लिलावधारकाने / परवानाधारकाने त्याला मंजूर केलेल्या वाळूगटाच्या ठिकाणी फलक लावून, उत्खनन क्षेत्राची सीमा निश्चित करून सीमा दर्शविणारे खांब उभारणे अनिवार्य राहील. विहीत केलेल्या क्षेत्राच्या बाहेर वाळू/ रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच लिलावधारकाने जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगीने सदर वाळूगटाचे कामकाज पहाण्यासाठी नियुक्त केलेल्या उपठेकेदार, व्यवस्थापक व कर्मचारी यांची नावे, पत्ता व जागेचा तपशील दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक राहील.

(ii) माननीय सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सी) क्र. 19628-1629/2009 मध्ये दि.27.02.2012 रोजी दिलेले आदेश तसेच नदीपात्रातील पाणी स्वच्छ व शुध्द राहण्यासाठी व नैसर्गिकरित्या पाण्याचे नदीपात्रात वहन होण्यासाठी वाळू/रेती गटातून जास्तीत जास्त 3 मीटर किंवा पाण्याची पातळी यापैकी जे कमी असेल तितक्या खोलीपर्यंत किंवा पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपर्यंत यापैकी जे कमी असेल तेवढया खोलीपर्यंत लिलावधारक /परवानाधारकाला वाळू/रेतीचे उत्खनन करता येईल.

(iii) नदीपात्रातील वाळू थराची जाडी सातत्याने राहण्सासाठी बेंच मार्क निश्चित करून बेंच मार्कच्या खाली कोणत्याही परिस्थितीत वाळूचे उत्खनन करता येणार नाही. निश्चित केलेले बेंच मार्क पडणार नाहीत, तसेच नदीपात्रातील वाळूच्या थराच्या आधारे आजूबाजूच्या विहीरीतील पाण्याची पातळी कमी होणार नाही, याबाबत योग्य ती दक्षता लिलावधारकाने घेणे आवश्यक राहील.

(iv) लिलावधारकास लिलावात मंजूर केलेल्या वाळूसाठयाइतकेच उत्खनन करण्याचा अधिकार प्राप्त होईल.

(v) वाळू/रेतीचे उत्खनन व वाहतूक सकाळी 6.00 ते सायंकाळी 6.00 या कालावधीतच करता येईल.

(vi) कोणत्याही रेल्वे पुलाच्या व रस्ते पुलाच्या कोणत्याही बाजूने 600 मीटर्स (2000 फूट) अंतराच्या आत वाळूचे उत्खनन करता येणार नाही.

(vii) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/ विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल.

(viii) सार्वजनिक पाणवठा / पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून 100 मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक राहील.

(ix) खाजगी मालकीच्या जमीनीतून, अशा जमिनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी, वाळू/रेती काढता येणार नाही तसेच रस्ते/ पायवाट म्हणून वापरात येणा-या जमिनीतून वाळू/रेती काढता येणार नाही.

(x) लिलावधारकास नदीपात्रामध्ये वाळू वाहतूकीसाठी मोठी वाहने नेता येणार नाहीत. लिलावधारकाने वाळूगटाच्या नजीकच्या मुख्य रस्त्यावर डेपो तयार करून वाळूगटामधून उत्खनन केलेली वाळू सदर डेपोमध्ये

साठवूण विक्री करावी. डोपोपर्यंतच्या वाळू वाहतूकीसाठी ट्रॅक्टर, ट्रॅलीचा वापर करावा. वाळू डेपोमध्ये सीसीटीव्ही लावणे अनिवार्य असून, त्याचे फुटेज दर आठवडयाला तहसिलदार यांना सादर करावे.

(xi) वाळू उत्खननासाठी लिलाव किंवा परवाना देण्यामागे वाणिज्यिक किंवा महसूल मिळविणे हा एकमेव उद्देश नसून, विकास कामासाठी आवश्यक वाळू उपलब्ध व्हावी हा प्रमुख उद्देश आहे. तसेच नदीपात्रात वाळू साठल्याने आजुबाजुच्या परिसरात पुरसदृश्य परिस्थिती उद्भवू नये म्हणून वाळूचे उत्खनन केले जाते. लिलावधारकास लिलाव मंजूर केल्यानंतर किंवा परवाना दिल्यानंतर लिलावधारकाने / परवानाधारकाने वाळूगटाचा ताबा दिल्याच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आत वाळू/रेतीचे उत्खनन सुरू करणे आवश्यक राहील.

<u>**वाळू / रेती लिलावाच्या अनुषंगाने इतर अटी व शर्ती**</u>

1. लिलावधारकाला नदीपात्रातून / नाल्यातून रेती / वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

2.लिलावधारकाने गावक-यांच्या निस्तार हक्कांस बाधा पोहोचविता कामा नये.

3. लिलावधारकाने रेती/वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेतीबाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरिक्षक, महसूल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरीक्षण करणा-या अधिका-यासाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करून द्यावीत.

4. लिलावधारकास वाळूची/ रेतीची वाहतूक करण्यासाठी परवाना द्यावयाचा असल्यास त्याने सहकारी संस्था/संस्थांना प्राधान्य दिले पाहिजे.

5. वाळूची वाहतूक करतांना वाहनातील वाळू प्लास्टिक पेपरने/ ताडपत्रीने आच्छादित करूनच वाळूची वाहतूक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतूक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

6.लिलावधारकाने त्याच्या लिलावस्थळातील रेती/वाळूची वाहतूक करणा-या वाहनास त्याच्या वहन क्षमते इतक्याच परिमाणाची वाहतूक करावी. वाहनक्षमतेपेक्षा अधिक परिमाणाची रेती/ वाळू वाहून नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण वाळू अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतूकीबाबत मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई करावी. दंडणीय कारवाईबरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात यावा.

7. रेती/वाळूचे उत्खनन करताना अथवा वाहतूक करताना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

8.लिलावधारकाने नियमात नमूद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतूदी नुसार असलेले नियम (संबंधित विभागास लागू असलेले नियम) आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदी नुसार लागू असलेल्या नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेतीचा/वाळूचा पूर्ण उपयोग गौण खनिज म्हणूनच केला पाहिजे.

9.रेतीचे/ वाळूचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने / ठेकेदाराने विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी/अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे सात दिवसात कळविले पाहिजे.

10 अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळूसाठा रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकाचा कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिणामापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास परवानगी देता येत नाही.

11.लिलावाने दिलेल्या क्षेत्रातून करारात नमूद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्यानेच वाळूचे /रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे, वाळूगटामधील वाळू मातीमिश्रीत आहे अशा तसेच मानवी वा

नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिला जाणार नाही व वाळूगट बदलून दिला जाणार नाही.

12.उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू/रेतीची साठवणूक, लिलाव व ज्या अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिका-याने केला असेल त्याच जिल्हयात करावी लागेल व त्यासाठी अकृषक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची असेल. वाळू/रेती ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी ज्या वाळू/रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळूचा/रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर10 दिवसात उत्खननाच्या जागेवरून हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल. अशा वाळूच्या / रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास अथवा त्यांच्या ठेकेदारास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही.

तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच 10 दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू/रेतीसाठा करण्यास परवानगी देता येणार नाही किंवा त्याच्या वाहतूकीसाठी दुय्यम वाहतूक पासेस देण्यात येणार नाहीत.

13. शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय लिलावधारकास लिलाव/ ठेका दुस-या कोणाकडेही हस्तांतरीत करता येणार नाही किंवा दुस-या कोणालाही चालविण्यास देता येणार नाही किंवा लिलावानंतर भागीदारही घेता येणार नाही.

14.लिलावधारकाने त्यांना मंजूर केलेल्या वाळूघाटातून उत्खनन केले आहे, त्याबाबतचे विवरणपत्र दर महिन्याच्या 10 तारखेला जिल्हाधिकारी यांना सादर करणे सक्तीचे आहे. प्रत्यक्षात अशी विवरणपत्रे लिलावधारकाकडून सादर केली जात नाहीत, असे आढळून येत आहे. त्यामुळे जे लिलावधारक मासिक विवरणपत्र विहित वेळेत सादर करणार नाहीत, त्यांच्याविरूध्द ठेका रद्द करण्याबाबत तसेच त्यांच्याविरूध्द दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी यांना असतील.

15. लिलावधारक, त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातून रेती/ वाळू काढण्याने धूप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातून वाळूचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी यांचा उत्खनन करण्यास प्रतिबंध करण्याचा निर्णय अतिंम राहील.

16. एकदा अत्युच्च बोली स्विकारून अंतिम करण्यात आलेल्या लिलावात कोणत्याही परिस्थीतीत रेती/ वाळू उत्खननाचा कालावधी वाढवून देण्याचा अथवा कोणत्याही कारणास्तव रेतीचा/ वाळूचा गट बदलून देण्याची मागणी लिलावधारकास करता येणार नाही. उत्खनन केलेल्या वाळूच्या / रेतीच्या वाहतूकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतूकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करून दिले जाणार नाहीत. तसेच वाहतूकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतूकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत रेती/वाळू उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही अथवा रेती/वाळूघाट बदलून दिला जाणार नाही.

17. अवैध वाळू/रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील नियम 48 (7) व(8) नुसार कारवाई करण्यात येईल.

18. लिलावधारकाने / परवानाधारकाने वाळू वाहतूकीसाठी वापरण्यात येणा-या वाहनांची माहिती तहसिलदार / जिल्हाधिकारी यांना देण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत वाहनाच्या वहन क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

19. अपर जिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी यांनी वाळूची वाहतूक करणा-या ट्रकना एकाच प्रकारचा रंग देणे शक्य आहे का याबाबतची शक्यता तपासून पाहून वाळू वाहतूकीसाठी एकाच प्रकारचा रंग दिलेले ट्रक वापरण्यात येईल.

20. वाळूचे / रेतीचे उत्खनन करताना किंवा ती काढताना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी / नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहील. अशा हानीची/नुकसानीची परिगणना सक्षम अधिका-याकडून करण्यात येईल व त्याबाबतचा त्याचा निर्णय अंतिम राहील व अशी रक्कम जमीन महसूलाच्या थकबाकीच्या वसूलीप्रमाणे संबधीत लिलावधारकाकडून वसूल करण्यात येईल.

21.लिलावाचा कालावधी तक्त्यात नमूद केलेप्रमाणे राहील.

22.लिलावधारकाने /परवानाधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाच्या अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ हातच्या किंमतीच्या 20 टक्के एवढी रक्कम अनामत रक्क्म म्हणून विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांच्याकडे ठेवणे आवश्यक राहील. ही रक्कम लिलावधारकाने/परवानाधारकाने लिलावाच्या/ परवान्याचया मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास लिलावाची/परवान्याची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. अटी व शर्तीचे पालन न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

23.लिलावधारकाने नियमानुसार मुद्रांक शुल्क, भूजल सर्वेक्षण फी, पर्यावरण शुल्क, स्वामीत्वधन, भुपृष्ठभाडे व इतर शुल्क शासनजमा करणे बंधनकारक राहील.

24.वस्तु व सेवा कर (जीएसटी) वस्तु व सेवाकर कार्यालयाने ठरवुन दिलेले नियमानुसार वस्तु व सेवा कर कार्यालयाकडे जमा करणे बंधनकारक राहील.

24.दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे जनहितास्तव कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकरी यांना असतील.

25.लिलावधारकांनी आपापसात संगनमत केल्यास, ठराविक वाळू घाटांचा लिलाव पुन्हा पुन्हा लावूनसुध्दा कोणीही लिलावधारक बोली बोलण्यास पुढे येत नाहीत व त्यामुळे वाळू घाटाचा लिलाव होऊ शकत नाही. अशा प्रकारे संगनमत करून शासनाच्या महसूलाचे नुकसान करणा-या तसेच अवैध उत्खनन व वाहतूकीसारखे गुन्हे करणा-या लिलावधारकास संपूर्ण राज्यासाठी काळया यादीत(Black List) टाकण्यात येईल.

26. पर्यावरण अनुमतीमध्ये परवानगी दिलेल्या खोलीपेक्षा जास्त खोल उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यास लिलावधारक /परवानाधारकाकडून घेण्यात आलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन लिलाव/परवाना रद्द करण्यात येईल. तसेच असे उत्खनन अवैध ठरवून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 मधील कलम 48 (7) व (8) नुसार कारवाई करण्यात येईल.

27.वाळू/रेतीची वाहतूक करणा-या वाहनचालकाकडे वैध बारकोडयुक्त वाहतूक पास आहे किंवा नाही याची शहानिशा करण्यात येईल. याबाबत निरीक्षणाच्या वेळी संबधित वाहनचालकाकडे वैध बारकोड युक्त वाहतुक पास आढळला नाही किंवा वाहतूक पासचा निर्दिष्ट कालावधी संपलेला असेल तर सदर वाळूचे उत्खनन/वाहतूक अवैध समजून त्याविरूध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 मधील कलम 48 (7) व (8) नुसार कारवाई करण्यात येईल.

28. अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणामध्ये संबधित ठेकेदार/लिलावधारक दोषी आढळल्यास त्यांच्याविरूध्द प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

प्रचलित नियमानुसार कारवाई करताना संबंधिताविरूध्द भारतीय दंड विधि संहीता कलम 34,114,379,392,393,394,396 इत्यादी कलमांतर्गत गुन्हा दाखल करणे, महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, 1966 मधील कलम 48 (7) मधील तरतुदीनुसासर दंडात्मक कारवाई करणे व कलम 48 (8) मधील तरतुदीनुसार वाळू उत्खननासाठी वापरलेली यंत्रसामुग्री व वाहतूकीसाठी वापरलेली वाहने जप्त करणे, अवैध उत्खनन केलेली वाळू जप्त करणे इत्यादी कारवाई करण्यात येईल.

29. वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या अनुष्ंगाने कारवाई करताना महसूल अधिकारी/कर्मचारी यांच्यावर हल्ले हात असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा अशा ठिकाणी संघटित गुन्हेगारीचे प्रकार आढळून आल्यास अशा संघटित गुन्हेगारीविरूध्द महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधद्रव्ये विषयक गुन्हेगार,

धोकादायक व्यक्ती व यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम 1981 अधिनियमान्वये कारवाई करण्यात येईल.

30. लिलावधारक / परवानाधारक यांनी पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचे तसेच पर्यावरण विषयक नियमातील तरतूदींचे पालन करणे बंधनकारक असेल. सदर तरतुदींचे उल्लंघन झाल्यास ते पर्यावरण (संरक्षण) अधिनियम 1986 मधील तरतूदीनुसार कारवाईस पात्र राहतील.

31.राज्यस्तरीय SEAC व SEIAA चे अटी व शर्तीचे पालन करणे लिलावधारकास बंधनकारक राहील.

32.मा.राष्ट्रीय हरित लवाद येथे दाखल केलेली याचिका क्र.MA No 601/602/608/609/2017, OA368/2015 मधील आदेश व मा.राष्ट्रीय हरित लवाद यांनी वेळोवेळी दिलेले आदेश लागू राहतील.

33.लिलावधारकाने वाळू/रेती गटातून वाळूचे उत्खनन हाताने (Manually) करावे लागेल. नदीपात्रातील वाळू/रेती उत्खननासाठी तसेच नदीपात्रातील वाळू वाहनात भरण्यासाठी पोकलेन, जेसेबी अशा प्रकारच्या कोणत्याही यांत्रिक साधनांचा वापर अनुज्ञेय नाही. सक्शन पंपाचा वापर अनुज्ञेय राहणार नाही.

34.वाळूगटातील वाळू वाहतूकीसाठी एकच रस्ता ठेवण्यात यावा.

35.वाळूगटाच्या उत्खनन व वाहतूकीच्या ठिकाणी लिलावधारकाने 24/7 छायाचित्रण होण्यासाठी CCTV कॅमेरे बसवण्यात यावे.

36. CCTV छायाचित्रणात वाहनामध्ये वाळु भरताना व वाहनांचा क्रमांक दिसणे आवश्यक राहील.

37. CCTV चोरीला गेल्यास किंवा तांत्रिक कारणामुळे किंवा इतर कारणामुळे बंद पडल्यास छायाचित्रीकरण अप्राप्त असल्यास लिलावधारक जबाबदार राहतील. व आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

38.वाळु उत्खननाच्या ठिकाणी वाळु वाहतुकीच्या रस्त्यावर व वाळु डेपोमध्ये या सर्व ठिकाणी कमीत कमी 04 CCTV लावणे बंधनकारक राहील.

39.लिलावधारकाने बसविलेल्या CCTV चा Address जिल्हाधिकारी/विभागीय आयुक्त व शासनाच्या महसूल व वन विभागाकडे द्यावा.

40.लिलावधारकाने वाळू उत्खनन व वाहतूकीचे छायाचित्रण असलेली हार्डडिस्क दर 15 दिवसांनी तहसील कार्यालयाकडे 02 प्रतित जमा करणे अनिवार्य राहील.

41.CCTV छायाचित्रकरणाचे लाईव्ह छायाचित्रण तहसिल कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय येथे दिसण्यासाठी लिलावधारकाने उपाययोजना करावी.

**42.राज्यस्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण(SEIAA) संपुर्ण अटी व शर्ती निविदा धारकास/ लिलावधारकास बंधनकारक राहतील.**

1. HIGHEST BIDDER to ensure no stream is diverted due to sand mining activity
2. HIGHEST BIDDER shall carry out sand mining by manual method only. No mechanical/electrical/power driven devices shall be used for sand mining.
3. HIGHEST BIDDER to ensure that mining/ loading activity shall be restricted to day hours' time only. No mining activity shall be carried out after sunset and before sun rise.
4. HIGHEST BIDDER to adhere to the provisions stipulated in the Sustainable Sand Mining Guidelines issued by MoEF&CC, Maharashtra Minor Mineral Extraction (Development and Regulation) Rules, 2013 and Sand Extraction Policy issued by Maharashtra Government in Revenue and Forest Department.
5. HIGHEST BIDDER to ensure strict compliance of all conditions stipulated in the Environmental Clearance. The HIGHEST BIDDER shall be held responsible for the non compliance of the conditions.
6. HIGHEST BIDDER to ensure that there is no damage to any fauna and its nesting close to the sand mining.
7. HIGHEST BIDDER to ensure that adequate measures like maintenance of roads, sprinkling of water and plantation is carried out to reduce the dust particulate matter pollution.
8. The HIGHEST BIDDER shall ensure that there is no violation of any order with respect to the sand mining passed by the Competent Court. (Particularly, the directions given by Hon'ble Supreme Court of India vide order dated 27.02.2012 in Deepak Kumar case [ SLP (C ) Nos. 19628-19629 of 2009] and order dated 05.08.2013 of the Hon'ble National Green Tribunal in aHIGHEST BIDDERlication No. 171/2013 be strictly followed.
9. HIGHEST BIDDER to provide movable toilets to the workers working in the area and the sewage generated shall be properly collected and treated so as to confirm to the standards prescribed by MoEF&CC and CPCB.

10. HIGHEST BIDDER to ensure that no wild life habitat is infringed.
11. HIGHEST BIDDER to ensure that parking shall not be made on Public roads or in the river bed.
12. The sand transportation shall be carried out through the covered trucks only and the vehicles carrying the mineral shall not be overloaded.
13. HIGHEST BIDDER to provide First Aid facility at the proposed mining site.
14. The digital processing of the entire lease area in the district using remote sensing technique including GPS shall be monitored regularly
15. HIGHEST BIDDER to ensure the directions given by Hon'ble National Green Tribunal, Pune in AHIGHEST BIDDEReal No 10/2013 (WZ) dated 1st October 2013 as below- "......However, we direct that when further auctioning process is required to be conducted, ordinarily, the sand beds falling between the sand beds which are now already auctioned shall be avoided unless there is special certification issued by the competent authority which would indicate absence of any environmental damage, having regard to precautionary principle which is required to be adopted. We mean to say, it should not haHIGHEST BIDDERen that presently the sand beds are auctioned by keeping distance of 1 k.m. from each other and gap is filled up subsequently under one or another pretext."
16. HIGHEST BIDDER to follow the standard environmental conditions for sand mining, as per the sustainable sand mining management guidelines 2016, issued by MoEF & CC.
17. HIGHEST BIDDER to ensure the strictly implementation of Environment management plan.
18. HIGHEST BIDDER to ensure that conditions stipulated in the Government Resolution (G.R.) dated 31.01.2018 issued by Revenue and Forest Department, Government of Maharashtra (GoM) is implemented in letter and spirit.
19. The instructions of MoEF & CC in the Sustainable sand mining guidelines 2016 [regarding sand mining aHIGHEST BIDDERroval and tracking system and transport of excavated sand] should be followed.
20. HIGHEST BIDDER to ensure that every receipt given is serially scanned and registration number so generated must be written on such receipt to avoid duplication and unauthorized transportation of the sand.
21. HIGHEST BIDDER to ensure that vehicles transporting sand should not be overloaded beyond stated capacity.
22. HIGHEST BIDDER should ensure that mining will be done strictly up to the depth recommended by GSDA.
23. The green belt development /tree plantation will be made either on river bank or along road side.
24. Measures for prevention & control of soil erosion and management of silt shall be undertaken.
25. HIGHEST BIDDER to ensure that there is no violation of the Supreme Court order and orders of the National Green Tribunal given in the related matters.
26. HIGHEST BIDDER will be held individually responsible for non compliance of the conditions stipulated in the Environmental clearance and shall be liable for legal action under Environment (Protection) Act of 1986.
27. Transport of sand should be through vehicle which is properly covered with Tarpaulin and it should not be overloaded.
28. HIGHEST BIDDER to ensure that the mining plan is approved by Director of Geology and Mining comprising study to show that annual replenishment of sand in the mining lease area is sufficient to sustain the mining operations at levels prescribed in the mining plan and that the transport infrastructure is adequate to transport the mined material.
29. Provisions stipulated in Maharashtra Minor Minerals Extraction (development and Regulation) Rules 2013 and Government Resolution of Revenue and Forest Department dated 03.01.2018 shall be strictly fallowed by HIGHEST BIDDER.
30. HIGHEST BIDDER will submit bank guarantee up to 2% of the total auction cost for the given auction period from the Lessee to ensure the compliance of the conditions stipulated. In case of violation of stipulated conditions by the Lessee, bank guarantee so obtained shall be forfeited and legal action under the law should initiated against such Lessee.
31. The distance 3 m or 10 % of the width of river whichever is more will be kept intact as a no mining zone.
32. No cutting of the trees shall be done while excavating the sand or while constructing the access road to sand ghat.
33. All mining shall be carried out manually.
34. Underwater mining shall not be permitted without the specific expert sanction of the State Government only for prevention of flood and increasing the capacity of reservoir if any it shall be ensured that excavation of minor mineral does not disturb or change the underlying soil characteristics of the river bed/basin, where mining carried out.
35. It shall be ensured that mining does not in any way disturb the turbidity, velocity and flow pattern of the river water.
36. It shall be ensured that there is no fauna dependent on the river bed or areas close to mining for its nesting is disturbed.
37. Turtle nesting units conservation is very important. Therefore sand mining in such areas is to be prohibited.
38. Precise mining area will be jointly demarcated at site by officials of Mining/Revenue department prior to mining operations for all proposals under consideration. Such site plan, duly verified by competent authority shall be submitted to Environment Department.
39. All necessary statutory clearances shall be obtained before start of mining operations.

40. No mining shall be carried out in the live streams.
41. Mining shall be limited to day hours time only.
42. No mining shall be carried out in the safety zone of any bridge and/or embankment.
43. No mining shall be carried out in the vicinity of natural/ manmade archaeological sites.
44. The lease holder shall obtain necessary prior permission of the competent authorities for drawal of requisite quantity of water (surface water and groundwater), if required for the project. Waste water, if any, shall be properly collected and treated so as to conform to the standards prescribed by MoEF/CPCB.
45. No wildlife habitat will be infringed.
46. Environmental clearance is subject to obtaining clearance under the Wildlife (Protection) Act, 1972 from the competent authority, if aHIGHEST BIDDERlicable to this project.
47. Green belt development shall be carried out considering CPCB guidelines including selection of plant species and in consultation with the local DFO/Horticulture Officer.
48. Parking of vehicles should not be made on public places.
49. Transportation of materials shall be done by covering the trucks / tractors with tarpaulin or other suitable mechanism so that no spillage of mineral/dust takes place.
50. It shall be ensured that there is no leakage of oil and grease from the vehicles used for transportation.
51. Special Measures shall be adopted to prevent the nearby settlements from the impacts of mining activities. Maintenance of roads through which transportation of minor minerals is to be undertaken, shall be carried out regularly.
52. Provision for first-aid, medical health care safe drinking water, and sanitation etc. shall be provided at site.
53. Ambient air quality will be monitored at the site and the nearest habitation regularly. Ambient air quality at the boundary of the precise mining area shall conform to the norms prescribed by MoEF & CC, GOI.
54. Measures shall be taken for control of noise level to the limits prescribed by CPCB
55. Any change in mining area, khasra /Gat numbers, entailing capacity addition with change in process and or mining technology, modernization and scope of working shall again require prior Environmental Clearance as per provisions of EIA Notification, 2006 (as amended).
56. The environmental clearance is being issued without prejudice to the action initiated under EP Act or any court case pending in the court of law and it does not mean that HIGHEST BIDDER has not violated any environmental laws in the past and whatever decision under EP Act or of the Honourable court will be binding on the HIGHEST BIDDER. Hence this clearance does not give immunity to the HIGHEST BIDDER in the case filed against him, if any or action initiated under EP Act.
57. In case of submission of false document and non-compliance of stipulated conditions, Authority/ Environment Department will revoke or suspend the Environmental Clearance without any intimation and initiate HIGHEST BIDDER appropriate legal action under Environmental Protection Act, 1986.
58. The Environment department reserves the right to add any stringent condition or to revoke the clearance if conditions stipulated are not implemented to the satisfaction of the department or for that matter, for any other administrative reason after consultation with SEIAA.
59. In case of any deviation or alteration in the project proposal from the one submitted to this department for clearance, a fresh reference should be made to the department to assess the adequacy of the condition(s) imposed and to incorporate additional environmental protection measures required, if any.
60. The above stipulations would be enforced among others under the Water (Prevention and Control of Pollution) Act, 1974, the Air (Prevention and Control of Pollution ) Act, 1981, the Environment (Protection) Act, 1986 and rules there under, Hazardous Wastes (Management and Handling ) Rules, 1989 and its amendments, the public Liability Insurance Act, 1991 and its amendments.

43.Environment Management Plan (EMP) करीता येणारा खर्च लिलावधारकास करावा लागेल.( EMP चा खर्च हातच्या किंमतीच्या 02 टक्के किंवा 4.5 लाख यापैकी जे अधिक असेल ते) लिलावधारकाने (EMP) ची मंलबजावणी समाधानकारकरित्या पुर्ण केली नसेल तर SEIAA च्या अटी व शर्तीमधील तरतुदीनुसार दंडात्मक व इतर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

44.लिलावधारक यांनी वाळु उत्खनन व वापरलेल्या पावत्या व शिल्लक पावत्या या बाबींचा सर्व हिशोब प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेला तहसिल कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय येथे देणे बंधनकारक राहील.

45.वाळु उत्खननासाठी दिलेल्या बारकोड पावत्या मंजुर केलेल्या वाळु उत्खननाकरीता वापरण्यात याव्यात. बारकोड पावत्या इतरत्र वापरल्यास वाळुघाट रद्द करून अनामत रक्कम जप्त करुन इतर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

46.वाळु वाहतुक करणा-या वाहनांना जीपीएस यंत्रणा लावणे बंधनकारक राहील.

47.हार्डडिस्क, CCTV, बारकोड पावती, व जीपीएसचा खर्च लीलावधारकास करावा लागेल.

48. मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल रिट याचिका 4830/2010 नुसार प्रत्येक महिन्याच्या दुसर-या व चौथ्या रविवारी उत्खनन बंद ठेवावे.

49.वाळू /रेती निर्गती सुधारित धोरण शासन निर्णय क्रमांक गौखनि-10/0615/प्र.क्र.289/ख दिनांक 03.01.2018 मधील सर्व बाबी लिलावधारकास बंधनकारक राहतील.

50.पाण्याखालील वाळूगटात दिनांक 10 जून ते 30 सप्टेंबर 2018 या कालावधीमध्ये वाळू उत्खनन करता येणार नाही.मंजुर झालेल्या वाळु साठयाचे उत्खनन पुर्ण न झाल्यास लिलावाचा कालावधी वाढवुन मिळणार नाही.

51.जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन प्रमाणीत केलेल्या बारकोड पावती वाळु वाहतुकीसाठी वापरणे बंधनकारक राहील.

52.शासन व मा.न्यायालय वेळोवेळी जे निर्देश देईल त्याचे पालन करणे बंधनकारक असेल.

वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास सर्व अनामत रक्कम तसेच लिलावधारकाने शासनास अदा केलेली सर्व रक्कम जप्त करून लिलाव रद्द करण्यात येईल आणि इतरही कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

(पराग सोमण)
**अपर जिल्हाधिकारी उस्मानाबाद**

**रेतीघाट ई निविदा/ई ऑक्शन धारकाने स्वखर्चाने विकत घेतलेल्या रुपये 100/- चे मुद्रांकित स्टॅम पेपरवर दोन साक्षीदारांसह द्यावयाचे प्रतिज्ञापत्र**

**हमीपत्र**

मी, (पूर्ण नाव) ------------------------------------------------------------------------------------------------

राहणार(पोस्टाचा पूर्ण पत्ता द्यावा) ---------------------------------------------------------------------------

ता. ------------------------------------------ जिल्हा ---------------------------------------------------------------

माझे/माझ्या संस्थेचे पॅन क्रमांक------------------ GST नं. -------------------------------------------------

मी प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो की, मी मौजे . . . . . . . . . . . ता. . . . . . . . . येथील वर्ष 2018-19 साठीच्या रेती लिलावाच्या अनुषंगाने. . . . . . . . . . वेबसाईटवर प्रसिध्द झालेल्या ई निविदेतील ई लिलावातील सर्व अटी व शर्तीची माहिती करुन घेतली आहे व मी निविदेत प्रस्तावित केलेल्या किंमतीत उक्त रेती घाट घेण्यास इच्छूक असून त्याची 25% रक्कम रु.................. RTGS व्दारे शासन जमा करीत आहे.

मला सदर रेती घाट मंजूर झाल्यास, लगेच भरणे आवश्यक असलेल्या लिलावातील सर्वोच्च बोलीच्या 25% रक्कमेपैकी वर नमुद EMD वजा जाता शिल्लक राहणारी रक्कम व इतर शुल्क लिलाव मिळताच मी भरेल. लिलावात मंजूर करण्यात आलेल्या रु................ किंमतीच्या उर्वरित 75% रक्कम व इतर शुल्क मी 15 दिवसांच्या आत चालानद्वारे शासन जमा करुन मंजूर रेती घाटाचे निष्पादन करुन घेण्याची हमी देत आहे. सदरची रक्कम मुदतीत भरण्यास मी कसूरदार ठरल्यास मी जमा केलेली 25% रक्कम रु............. शासन जमा करण्यास माझी हरकत नाही.

तसेच नियमानुसार फेर निविदेद्वारे दुस-या निविदा धारकास सदरचा रेती घाट मंजूर केल्यास माझी काही हरकत राहणार नाही. फेर निविदेद्वारे शासनाच्या महसुलाचे काही नुकसान झाल्यास, सदर नुकसानीची भरपाई जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल माझयाकडून करण्यास मी संमती देत आहे.

फेर निविदेत पूर्वी मंजूर करण्यात आलेल्या लिलावाच्या रक्कमेपेक्षा अधिकची रक्कम आल्यास आधीकच्या रक्कमेवर माझा काहीही अधिकार राहणार नाही. मला यापुर्वी महाराष्ट्र राज्याच्या कुठल्याही जिल्हयात काळया यादीत टाकण्यात आलेले नाही. तसेच पर्यावरण विषयक अटी व शर्तीची व Environment Managament Plan बद्दल मी सर्व माहिती करुन घेतली आहे.

मी असेही घोषित करतो की, सदरहू रेती घाट आणि रेती घाटास जाणारे पोच/गाव रस्ते इत्यादिची मी पाहणी केली आहे,त्याच्या परिस्थितीबाबत अथवा रेती वाहतुकीसाच्या योग्यतेबाबत मी भविष्यात कोणताही आक्षेप/वाद उपस्थित करणार नाही.

ठिकाण -----------------

दिनांक ------------------

( )

अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी

1. पूर्ण नाव --------------------------------------------- स्वाक्षरी ---------------

   पत्ता ----------------------------------------------------------------------------

2. पूर्ण नाव --------------------------------------------- स्वाक्षरी ----------------

   पत्ता-----------------------------------------------------------------------------